**PADMABHUSHAN VASANTRAODADA PATIL MAHAVIDYALAYA, KAVATHE MAHANKAL**

**Department of Economics**

**REPORT**

| | |
|---|---|
| Title | **Study Tour- Directorate of Beekeeping, & Strawberry Farming – Mahabaleshwar** |
| Day &Date: | Tuesday 03/02/2026 |
| Organizer | Department of Economics, |
| Beneficiary: | Students of Padmabhushan Vasantraodada Patil, Mahavidyalaya, Kavathe Mahankal. |
| No. of Student Participated | 17 |
| Participated teachers | Mr. K.L. Sakat (HOD, Economics), Mr. R.R Vasave (Assist. Prof. Eco) Mr. D.L Sakat. Mrs. P. S. Gadikar |
| Background: | Institutional orientation programs play a crucial role in ensuring that students have a smooth transition into their new academic environment. These programs not only provide an opportunity for students to get acquainted with the institution but also familiarize them with the various committees and support systems in place. |
| Objective | To understand the importance and methods of beekeeping and honey production. to study modern techniques used in strawberry farming.<br>To gain practical knowledge about agriculture and allied activities.<br>To create awareness about the role of agriculture in economic development and environmental sustainability. |
| Learning Outcomes | The tour helped students understand the practical aspects of beekeeping and strawberry farming. It enhanced their knowledge about sustainable agriculture, income generation, and the importance of biodiversity. Students actively participated, asked questions, and gained valuable real-life experience. |
| Conclusion: | The study trip included 17 students and 3 faculty members visiting the Directorate of Beekeeping, & Strawberry Farming –Mahabaleshwar Dist. Satara. The educational tour was highly informative and beneficial. It provided insights into modern agricultural practices and encouraged students to explore opportunities in farming and allied sectors. Such tours play an important role in bridging the gap between theoretical and practical knowledge. We express our sincere gratitude to the faculty members, officials at the Directorate of Beekeeping, and local farmers for their guidance and support in making this tour successful. |

P.V.P MAHAVIDYALAYA KAVATHE MAHANKAL

Acting Principal
Padmabhushan Vasantraodada Patil
Mahavidyalaya, K. Mahankal Dist. Sangli

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,

क. महांकाळ, जि. सांगली

अर्थशास्त्र विभाग

## अहवाल :- मधमाशी पालन संचालनालय, महाबळेश्वर व स्ट्रॉबेरी शेती – महाबळेश्वर

**पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, क. महांकाळ, जि. सांगली , अर्थशास्त्र विभाग** ची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ ची शैक्षणिक सहल महाराष्ट्र खादी आणि ग्रामोद्योग मंडळ, मधमाशी पालन संचालनालय, महाबळेश्वर व स्ट्रॉबेरी शेती च्या अभ्यासासाठी दिनांक ०३ फेब्रुवारी २०२६ रोजी एक दिवसासाठी आयोजित करण्यात आली या सहली मध्ये अर्थशास्त्र विभागातील एकूण १७ विद्यार्थी-विद्यार्थिनी नी सहभाग घेतला.

**सहलीचे मुख्य उद्दिष्ट पुढीलप्रमाणे होते:**

- मधमाशी पालनाचे महत्त्व समजून घेणे
- मध उत्पादनाची प्रक्रिया जाणून घेणे
- स्ट्रॉबेरी शेतीचे आधुनिक तंत्र समजणे
- विद्यार्थ्यांमध्ये कृषीविषयक जागरूकता निर्माण करणे
- पर्यावरण व जैवविविधतेचे महत्त्व समजणे

### महाबळेश्वर भोगोलिक व ऐतिहासिक माहिती :

महाबळेश्वर हे ठिकाण महाराष्ट्राच्या सातारा जिल्ह्यातील एक थंड हवेचे ठिकाण व प्रेक्षणीय स्थळ असून, येथे पर्यटक वर्षभर भेट देतात. ब्रिटिश काळापासून महाबळेश्वराला लाभलेला उत्कृष्ट गिरीस्थान हा लौकिक आजही कायम आहे. समुद्रसपाटीपासून १,३७२ मीटर उंचीवर पश्चिम घाटांच्या रांगेत वसलेले महाबळेश्वर हे थंड हवेचे व सहलीचे निसर्गरम्य ठिकाण आहे. महाराष्ट्राचे नंदनवन म्हणून ओळखले जाणारे ठिकाण आहे. हे आतिशय थंड हवेचे ठिकाण आहे. महाबळेश्वर हे सुंदर पर्यटन स्थळ आहे.

सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर हे एक नगरपालिका असणारे तालुक्याचे शहर आहे. सह्याद्री पर्वताच्या पश्चिम घाटातील उंच डोंगरावर हे वसलेले शहर आहे. भारतातील जी हिरवळीने सजलेली काही मोजकीच ठिकाणे आहेत. त्यातीलच हे एक ब्रिटिश राजवटीतील मुंबई परगण्याची उन्हाळ्यातील राजधानी होती, याचे क्षेत्रफळ १३७.५१ किमी.(५२.९५, स्क्वे.मीटर) आहे. समुद्रसपाटीपासून याची उंची १३५३ मीटर(४४३९ फुट) आहे. सन २०११ चे शिरगणतीनुसार याची लोकसंख्या १२७३७ आहे. येथे मराठी, हिंदी या भाषा बोलल्या जातात. पुरुष / स्त्री प्रमाण १०/९ असे आहे. येथील साक्षरता प्रमाण ७८% आहे. ६ वर्षाखालील मुलाची ११% लोकसंख्या आहे.

सन १८१९ मध्ये ब्रिटीशांनी सर्व डोंगरी भाग साताऱ्याच्या राज्यांच्या छत्राखाली आणला. कर्नल लॉडविक हे सातारचे स्थानिक अधिकारी होते त्यांनी एप्रिल १८२४ मध्ये विभागातील सर्व सैनिक आणि वाटाड्याना तसेच भारतीय मदतनीस घेऊन या पॉइंट पर्यन्त पोहचले तो आता लॉडविक पॉइंट म्हणून ओळखला जातो. सन १८२८ पासून सर ऋग्वेद, माऊंट स्टुअर्ट एल्फिंस्टन, आर्थर मॅलेट, करणक, फ्रेरे आणि कितीतरी येथे भेटी देणारे होते. महाबळेश्वरची ओळख १९२९-३० मध्ये झाली. त्यापूर्वी ते माल्कम पेठ या नावाने ओळखले जात होते. पण आता ते महाबळेश्वर आहे. महाबळेश्वर येथे "राज भवन" हे उन्हाळ्यात महाराष्ट्राचे राज्यपालांचेसाठी निवासस्थान आहे ते दी. टेरेस नावाच्या जुन्या इमारतीत आहे तिची खरेदी १८८४ मध्ये केलेली आहे.

## मधमाशी पालन संचालनालय , महाबळेश्वर

मधमाशी पालन संचालनालयाची स्थापना १९४६ मध्ये महाबळेश्वर येथे झाली. सेंद्रिय मधाचा प्रकल्प मंडळामार्फत राबविला जातो, तसेच मंडळाने विकसित केलेल्या मधुबन ब्रँडचे ब्रँडिंग केले जाते आणि त्यामुळे सेंद्रिय मधाला मोठी मागणी आहे.

मधमाशी पालन संचालनाल नोंदणीकृत शेतकरी, मधमाशीपालन यांच्याकडून मध गोळा करतो व गुणवत्तेच्या मापदंडानुसार शुद्धतेसाठी प्रयोगशाळेत विविध भौतिक आणि रासायनिक चाचण्या करतो. मधुबन प्रयोगशाळेत मधाची चाचणी आणि प्रक्रिया करण्यासाठी प्रगत उपकरणे आहेत. प्रक्रिया केलेले मध विक्रीसाठी काचेच्या बाटल्यांमध्ये पॅक केले जाते. मधुबन मधाच्या विक्रीसाठी मधमाशी पालन संचालनालयाचे स्वतःचे आऊटलेट्स आहेत. मधुबन विक्री केंद्रे सातारा, पुणे, मुंबई येथे आहेत.

शेतकऱ्यांना मधमाश्यांच्या पेट्या देऊन परागणाचा प्रसार व्हावा आणि मधमाशीपालकांना अतिरिक्त रोजगार निर्माण व्हावा या उद्देशाने मधुबन मधमाशी पालन योजना राबवत आहे.

मधुबन मधमाशीपालनाचे प्रशिक्षण, मधमाश्यांच्या पेट्यांचा पुरवठा, तांत्रिक मार्गदर्शन, मधमाश्यांच्या वसाहतींचा पुरवठा, मधमाशांच्या राण्यांचे वितरण, वसाहती ताब्यात घेणे आणि नवीन वसाहतींचे प्रजनन, रोपवाटिकांमधून मध उत्पादन, संशोधन, प्रक्रिया करणे अशी कामे करतात. मध, मध आणि मेणाची विक्री इ.

**मधुबन उद्दिष्टे:**

- मधमाशीपालकांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देणे
- संशोधन, प्रशिक्षण आणि विकास उपक्रम हाती घेणे
- निरोगी मधमाशी वसाहती आणि वाजवी दरात उपकरणे प्रदान करणे
- मध, मेण आणि उत्पादनानुसार हमीभावाने खरेदी करा

संपूर्ण महाराष्ट्रासाठी एकात्मिक मधमाशी पालन, मधमाशी प्रजनन आणि मध उत्पादन योजना (पूर्वीचा पश्चिम घाट विकास कार्यक्रम) योजना

**मधुमक्षिका पालन योजना आणि कार्यक्रमांची माहिती**

1) पश्चिम घाट विकास कार्यक्रम / मधमाश्या पालनाच्या मराठवाडा विकास कार्यक्रमांतर्गत अहवालाअंतर्गत वर्षभरात सत्तेरी / मेलिफेरा मधमाशांच्या 6 मधमाश्यांच्या पेट्या आणि 30 सत्तरी / मेलिफेरा बेसच्या मध काढण्याच्या यंत्रांचे वाटप करण्यात आले.

२) २०२५ मध्ये प्रशिक्षण- अहवालांतर्गत वर्षभरात १००० हून अधिक लाभार्थ्यांना मधुमक्षिका पालनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

## स्ट्रॉबेरी शेती भेट , महाबळेश्वर

स्ट्रॉबेरी ही एक आकर्षक, स्वादिष्ट व पोषक फळपिक असून तिची शेती प्रामुख्याने थंड हवामानाच्या प्रदेशात केली जाते. महाराष्ट्रातील महाबळेश्वर परिसर स्ट्रॉबेरी उत्पादनासाठी विशेष प्रसिद्ध आहे. या पिकासाठी सुपीक जमीन, योग्य हवामान व आधुनिक शेती तंत्रज्ञान आवश्यक असते. कमी कालावधीत चांगले उत्पन्न देणारे हे पीक असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये स्ट्रॉबेरी शेतीचा कल वाढत आहे. तसेच या पिकामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून रोजगाराच्या संधीही निर्माण होतात. महाबळेश्वर हे स्ट्रॉबेरी उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे. येथे आम्ही प्रत्यक्ष शेतात जाऊन शेतीची माहिती घेतली.

**स्ट्रॉबेरी शेतीची माहिती:**

- थंड हवामान स्ट्रॉबेरीसाठी योग्य असते
- योग्य जमिनीची निवड व सिंचन आवश्यक असते
- प्लास्टिक मल्चिंग पद्धतीचा वापर केला जातो

**स्ट्रॉबेरी शेतीची लागवड प्रक्रिया:**

- रोपे लावणे
- नियमित पाणी देणे
- खतांचा योग्य वापर
- कीड नियंत्रण

**स्ट्रॉबेरी शेतीची  उत्पादन व विक्री:**

- स्ट्रॉबेरीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते
- बाजारात व प्रक्रिया उद्योगात विक्री केली जाते
- जॅम, जेली, ज्यूस इ. तयार केले जातात

**स्ट्रॉबेरी शेतीची फायदे:**

- चांगले उत्पन्न मिळते
- रोजगाराच्या संधी निर्माण होतात
- स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होते.

**विद्यार्थ्यांचा अनुभव**

या सहलीमुळे विद्यार्थ्यांना नवीन गोष्टी शिकण्याची संधी मिळाली. मधमाशी पालन व स्ट्रॉबेरी शेती याबद्दल प्रत्यक्ष अनुभव मिळाल्याने विषय अधिक स्पष्ट झाला. विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रश्न विचारले व मार्गदर्शकांकडून माहिती घेतली.

**शैक्षणिक सहल निष्कर्ष**

ही शैक्षणिक सहल अत्यंत उपयुक्त व ज्ञानवर्धक ठरली. विद्यार्थ्यांना कृषी क्षेत्रातील विविध संधींची माहिती मिळाली. मधमाशी पालन व स्ट्रॉबेरी शेती यामुळे उत्पन्न वाढवता येते, हे समजले. अशा प्रकारच्या सहली भविष्यातही आयोजित कराव्यात, अशी अपेक्षा आहे.

**आभार**

या सहलीचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक व मार्गदर्शक यांचे मनःपूर्वक आभार. तसेच मधमाशी पालन संचालनालय व शेतकऱ्यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत.

पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, क. महांकाळ, जि. सांगली

## अर्थशास्त्र विभाग

## शैक्षणिक सहल-  मधमाशी पालन संचालनालय, महाबळेश्वर फोटो (वर्ष २०२५-२६)







मधमाशी पालन व्यवसाया ची माहिती घेत असताना व तेथील कर्मचार्यांशी चर्चा करतांना विद्यार्थी

**पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, क. महांकाळ, जि. सांगली**

**अर्थशास्त्र विभाग**

**शैक्षणिक सहल- स्ट्रॉबेरी शेती महाबळेश्वर वर्ष २०२५-२६ फोटो**







**स्ट्रॉबेरी शेतीची माहिती घेत असताना व स्ट्रॉबेरी उत्पादक शेतकरी यांच्याशी चर्चा करतांना विद्यार्थी**